# प्रकरण दुसरे

## अनंत मनोहर यांच्या साहित्याचे स्वरूप आणि वेगळेपण.

## प्रकरण दुसरे

## अनंत मनोहर यांच्या साहित्याचे स्वरूप

अनंत मनोहर यांचे लेखन १९८० नंतरचे आहे. त्यामुळे अलीकडच्या काळाचा परिणाम त्यांच्या साहित्य लेखनावर झालेला दिसून येतो. सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक बदलांचा परिणाम साहित्यावर होतोच. त्याचबरोबर समाजातील इतर बाबींकडेही ते लक्ष देतात. त्यामुळे त्यांचे लेखन वास्तव वाटते. अनंत मनोहरांच्या कथा, कादंबऱ्यांतून वास्तव जीवन चित्रण आलेले आहे. अनंत मनोहरांची साहित्यसंपदा मोठी आहे. समाज आणि त्या समाजात राहणारी व्यक्ती यांचे नाते अतूट असते. त्यामुळे माणूस ज्या समाजात राहतो त्या समाजाचे प्रतिबिंब, विचार करण्याची वृत्ती ही साहित्यात उमटताना दिसते. अनंत मनोहरांच्या लेखनात काही प्रश्नांवर, महत्त्वपूर्ण घडामोडींवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न दिसतो. त्यांच्या कथालेखनापेक्षा कादंबरी लेखन अधिक झाल्याचे दिसून येते. त्याचबरोबर अनंत मनोहरांच्या नावावर एक ललितलेख, अनुवाद लेखही आपल्याला पाहवयास मिळतात. त्यांच्या नावावर १५ कादंबऱ्या , चार कथासंग्रह, एक ललित लेख, एक अनुवाद लेखन इतकी साहित्य संपदा आहे.

**कादंबऱ्या-**

१) वाटचाल, २) प्रतिष्ठा,

३) पैलतीर, ४) तूच मांडिसी तूच मोडिसी,

५) उजळल्या दिशा, ६) उदास हळवे सूर,

७) देता किती घेशील, ८) दोन मुठी तांदूळ,

९) शहाणा उंटावरचा, १०) अगतिक,

११) दक्षिण वारा , १२) पूर्ण झालेले वर्तुळ,

१३) साम्राज्याचा अस्त, १४) राक्षसाचा नि:पात,

१५) राब.

**'राब' -**

'राब' ही एक प्रादेशिक कादंबरी आहे. कोकणी जीवनाचे संघर्षमय चित्रण या कादंबरीत केले आहे. 'राब' ही कादंबरी दीर्घ स्वरूपाची आहे. ती वाचत असताना एक उत्कंठा वाचकांच्या मनात निर्माण करण्याचा प्रयत्न अनंत मनोहरांनी केला आहे. गुणा व तिचा ल्योक शिवा या मायलेकांचा संघर्षमय लढा या कादंबरीत चित्रित केला आहे. गुणाचा नवरा भिवा व चुलत सासरा यांच्यात कौटुंबिक वाद झाल्यावर भिवा गुणाला घेऊन शहरात जातो. तेथे संसार थाटतो. चुलत सासरा (धोंडूबा मोरे) हा महाबिलंदर माणूस आहे. स्वत:च्या पुतण्याची (भिवाची) जमीनदेखील तो स्वत: लाटायला बघतो. पण निसर्गाला हे मान्य नव्हते. धोंडूबाची दोन मुले अचानक मरण पावतात. तिसराही अंथरुणाला खेळून असतो. त्यावेळी धोंडूबाची बायको म्हणते, ''भिवाची जमीन वाटून द्या ; नाहीतर त्याचा शाप लागल पोराला.'' तेव्हा धोंडूबा मोरे गुणाला जमीन वाटून द्यायला तयार होतो. इकडे शहरात भिवाचे निधन झाल्यानंतर घराची सगळी जबाबदारी गुणावर पडलेली असते. मुलगा (शिवा) याला कोणत्याही प्रकारचे दु:ख, कष्ट माहीत नव्हते. शहरात राहून तिथल्या त्या पद्धतीत वाढलेला शिवा या कादंबरीत भेटतो. गावाकडून गुणाला पत्र येते. गुणा शिवाला घेऊन

गावी येते. सासऱ्याच्या घरी न उतरता ती भिवाच्या मित्रांच्या चंदररावजी यांच्याकडे उतरते. त्याचा राग धोंडूबाला येतो. चंदरराव, बाबाजी हे भिवाचे मित्र आहेत. पण गुणावहिनीला प्रत्येक कामात या दोघांची मदत भेटते. धोंडूबा गुणाला जमीन वाटून देताना हलक्या प्रतीची जमीन तिच्या वाट्याला देतो. गुणा व शिवा त्या जमिनीचे सोने करतात. शिवाला गावाकडची माणसे, रितिभाती समजतात. चंदरराव व अन्नपूर्णा वहिनीची मुलगी पुतळी हिच्याशी शिवाचे लग्न लावून दिले जाते. कोकणातील निसर्ग व ऋतुचक्र याचे तपशीलवार वर्णन या कादंबरीत येते. उन्हाळा, हिवाळा कोकणी माणूस कष्ट करून जीवन जगू शकतो ; पण पावसाळ्यात पाऊस इतका असतो की, त्यामुळे काहीच करू शकत नाही. पावसाळ्यात माणसाला अन्नाचा कण मिळत नाही. कोकणातील दारिद्र्याचे वास्तव चित्रण या कादंबरीत केले आहे.

कोकणातील जीवनदर्शन घडविताना वातावरण निर्मिती, प्रसंग निर्मिती, पात्र रचना, भाषाशैली यांची योग्य मांडणी केल्यामुळे ही कादंबरी अधिकच रमणीय वाटते. माणसांच्या वृत्ती- प्रवृत्ती, त्यांच्यातील संवाद यामुळे या कादंबरीतील वातावरणाशी वाचक एकरूप होऊन जातो. 'राब' घालून पारंपरिक पद्धतीने शेती करणारे कोकणी लोक भेटतात. 'राब' घालणे म्हणजे शेतात जळण टाकून ते जळण पेटवून द्यायचे. म्हणजे त्या जळणाची होणारी राख ही शेतीला उपयुक्त असते. त्यामुळे जमिनीचा कस वाढतो. ही शेती करण्याची पारंपरिक पद्धत वापरली जाते. या राबाप्रमाणेच कोकणी लोकांचे जीवन आहे. आधी त्याग करावा लागतो, मग सुख मिळते. पावसाळ्यात कोकण

जितका रम्य वाटतो तितकाच तो कुरूप रूप धारण करतो. आपल्याला कोकणातील निसर्ग मनाला भुरळ घालतो. त्याच कोकणातील लोकांचे जीवन किती कष्टमय असते ते या कादंबरीवरून लक्षात येते.

परिस्थितीशी झुंज देणाऱ्या मायलेकरांचे चित्रण या कादंबरीत केले आहे. परिस्थितीने माणूस घडतो. शिवाला आलेले अनुभव, त्या अनुभवातून जीवन जगण्याचे धैर्य शिवाला या कोकणाकडून मिळते. आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक परिस्थितीचे चित्रण या कादंबरीत येते.

**२) दोन मुठी तांदूळ- दारिद्र्याचे चित्रण-**

या कादंबरीतील नायक केशव हा कोकणात नोकरीच्या निमित्ताने जातो. भिरगावातील वेगवेगळे अनुभव केशव कथन करतो. कोकणी लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती, विचार करण्याच्या पद्धती, रिति- भाती याविषयी सतत त्याच्या मनात उत्सुकता असते. कोकणातील लोकांना येणाऱ्या अडचणी, त्यावर समर्थपणे मात करणारा कोकणी माणूस यांचे वर्णन या कादंबरीत आले आहे. व्यक्ती व निसर्ग यांचे एक अतूट असे नाते असते. ते नाते स्पष्ट करण्याचा प्रयत्न या कादंबरीतून झाला आहे. कोकणातील गावाची एक विशिष्ट रचना असते. गावात वेगवेगळ्या धर्मांचे लोक एकत्र राहतात. एकमेकांना मदत करतात. कोकणाचे एक विशेष म्हणजे गावात म्हातारे लोक जास्त आणि तरुण मंडळी कमी असतात. याचे कारण म्हणजे नोकरीनिमित्ताने तरुणांना शहरात जावे लागते. यावरून आर्थिक विषमता लक्षात येते. कोकणात उन्हाळ्यात, हिवाळ्यात काहीही करून काम मिळविता येते. पण पावसाळ्यात कामच मिळत नाही. निसर्गाचे रूद्ररूप पाहयला मिळते. कोकणी माणसावर उपाशी मरण्याची पाळी येते. शहरात नोकरीसाठी गेलेली मंडळी

सणावारासाठी गावात एकत्र येतात. यावरून या प्रदेशातील सांस्कृतिकता लक्षात येते.

प्रस्तुत कादंबरीतील केशव (मास्तर) ज्या घरात राहत होता, त्या घरातील घरमालकाची तिन्ही मुले मुंबईला नोकरी करत होती. केशवला भिरगावातील मंडळी सन्मानाने वागणूक देतात. गावच्या लोकांच्या सहकार्याने केशव गावातील शाळेत सुधारणा घडवून आणतो ; आणि शाळेला एक आकार देतो. गावातील माणसे केशवबरोबर आपुलकीने वागतात.

कोकणातील दारिद्र्यामुळे तरुण मुले मिलिट्रीत भरती होतात. यावरून दारिद्र्याची भीषणता कळते. या कादंबरीत समाजवास्तव चित्रित केले आहे. मुंबईला मिळेल त्या पगारावर मिळेल ती नोकरी कोकणी तरुणाला करावी लागते. त्यातूनच आपली गरज भागवून गावाकडेही पैसे द्यावे लागतात. यावरून आर्थिक दुर्बलता लक्षात येते. माणसाला पोटासाठी दोन मुठी तांदळाची गरज असते. ते दोन मुठी तांदूळही मिळत नाहीत. हे वास्तव चित्रण या कादंबरीत चित्रित केले आहे. शाळेत विविध सुधारणा करून मुलांना शाळेत बसविता येईल ; पण जेव्हा मुलांच्या पोटात अन्नाचा कण नसेल तेव्हा त्यांचे लक्ष शाळेत लागणार नाही हे वास्तव चित्रण या कादंबरीत आले आहे. 'दोन मुठी तांदूळ' हे समर्पक शीर्षक या कादंबरीला दिले आहे.

**अरण्यकांड-**

ही कादंबरी वन्यजीवनावर लिहिली आहे. या कादंबरीत अरण्यात येणारे सर्व घटक समाविष्ट केले आहेत. वन्य जीवनाचे सूक्ष्म चित्रण या कादंबरीत आले आहे. निसर्गातील सर्व घटकांचे यथातथा चित्रण

...३९
BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कादंबरीत केले आहे. आदिवासी लोकांच्या वृत्ती - प्रवृत्ती, रूढी, विचार करण्याच्या पद्धतीचे सूक्ष्म चित्रण या कादंबरीत येते. प्राणी जीवनावर विशेष प्रकाश या कादंबरीत टाकला आहे. आदिवासी लोक रोजच मृत्यूशी सामना करतात. जीवन जगताना येणाऱ्या अडचणींवर मात करत जीवन जगावे लागते. या प्रस्तुत कादंबरीत आदिवासी लोकांच्या समस्या, व्यथा मांडण्याचा प्रयत्न केला आहे. जंगलाचे रक्षण करणारे फॉरेस्ट अधिकारी मणी व पीटर लोब्रो यांना येणाऱ्या अडचणी, आदिवासी लोकांकडून होणारा उपद्रव, त्रास सहन करावा लागतो. या सर्वांचे चित्रण येथे येते.

या कादंबरीत अरण्यातील जीवनरहाटीचा अनोखा अनुभव परिचित करून दिला आहे. निसर्गातील झाडे, वेली, ऋतू, प्राणी, पक्षी यांचे विस्तृत वर्णन सूक्ष्मपणे केले आहे. किंग कोब्रा याला पकडण्यासाठी आलेली परदेशी मंडळी व त्यांच्यावर ओढवलेला मृत्यू यांचे चित्रण अनंत मनोहर करतात. आदिवासींच्या जीवनावर प्रकाश टाकणारी ही एक महत्त्वपूर्ण कादंबरी आहे.

**दक्षिणवारा-**

ही कादंबरी म्हणजे 'मेरी' या ख्रिश्चन स्त्रीची शोकांतिका आहे. ती मोठ्या उत्कटपणे व हळुवारपणे रेखाटली आहे. या कादंबरीच्या कथानकात वाचक गुंफला जातो. मेरी बाहेरगावी गेल्यावर तिच्या पश्चात घरात डॉन नावाची मुलगी येऊन राहते. मेरी गावावरून आल्यापासून तिला सतत घरात कोणीतरी आहे असा भास होतो. डॉन मेरीच्या घराच्या पोटमाळ्यात लपून बसली होती. डॉन रेडिओ ऐकत होती. त्याचा आवाज

मेरीला येत होता. एक दिवस मेरी त्या रेडिओच्या आवाजाच्या दिशेने जाते. त्यावेळी मेरीला डॉन भेटते. मेरी डॉनला स्वत:कडे ठेवून घेते. १६ वर्षांच्या डॉनला मेरी मुलीप्रमाणे प्रेम देते. डॉनची कोणतीच पार्श्वभूमी मेरीला माहीत नव्हती. डॉन कोण, कुठली ती इथे का आली असा ती प्रश्न करते. पण डॉन ही चलाख असल्यामुळे मेरीचे काहीच चालत नाही. मेरीचा शेजारी अन्तोन याचे मेरीच्या घराकडे बारीक लक्ष होते. मेरीने ठेवून घेतलेल्या मुलीविषयी त्याचे मत चांगले नव्हते. मेरीला तो सांगतो की, डॉन ही मुलगी चांगली नाही. तिला तू ठेवून घेऊ नकोस ;पण मेरी त्याचे ऐकत नाही. अन्तोन एकदा मेरीला व डॉनला चहाला बोलवतो. त्यावेळी डॉन अन्तोनची पिस्तूल चोरून आणते. डॉनबरोबर तिचा साथीदारही त्याच घरात तिने लपवून ठेवला होता. मेरीला दुधातून गुंगीचे औषध देऊन तिला झोपू देते. त्यानंतर डॉन साथीदाराला घरात वावरायला परवानगी देते. याची खबर मेरीला नव्हती. डॉन व तिचा साथीदार हे अट्टल गुन्हेगार प्रवृत्तीचे असतात. मेरीच्या घरात राहून तिच्या घरावर कब्जा करतात. तिच्या घरातील सर्व नोकरांना काढून टाकतात. मेरीला घरातील कामे करायला लावतात. मेरीला नजर कैदेत ठेवतात. मेरीच्या ओळखीचे कोणी आले तर मेरीला बोलूदेखील देत नाहीत. डॉनकडून मेरीला वाट्टेल ते ऐकून घ्यावे लागते. एक दिवस मेरी घरातून पळून जाण्याचा प्रयत्न करते पण त्यात ती असफल होते. अन्तोनवर आपण अविश्वास दाखविला याचा तिला पश्चात्ताप होतो. शेवटी अन्तोनच या प्रसंगातून तिची सुटका करतो. या कादंबरीतून मानवी वृत्ती- प्रवृत्तीवर प्रकाश टाकला आहे.



16121

**शहाणा उंटावरचा-**

ही कादंबरी मध्यमवर्गीय तरुणावर लिहिली आहे. 'प्रेम' यासारखा नाजूक विषय या कादंबरीच्या कथानकाचा मुख्य विषय आहे. लखनसिंग हा 'दशेरा' या गावात राहणारा गुणी मुलगा आहे. या कादंबरीत आलेला प्रदेश हा पाकिस्तानच्या सरहद्दीवरील आहे. या गावात वाहणारी 'बिछैली' नदी. येथे पिकणारा प्रसिद्ध आंबा ; याचे वर्णन कादंबरीच्या सुरुवातीलाच केले आहे. लखनसिंग व प्रीतम हे बालपणापासून एकत्र वाढलेले आहेत. दोघांच्या कुटुंबांत एकमेकांबद्दल प्रेम, आपुलकी, आदर दिसतो. लखनला बुद्धिबळ खेळण्याचा नाद होता, तर प्रीतमला या बुद्धीबळातील काहीच कळत नव्हते. कोणते प्यादे किती घरे चालते हे तिच्या लक्षात येत नव्हते. एक दिवस लखन व प्रीतम बुद्धिबळाने खेळत होती. त्याचवेळी एका अमेरिकन वार्ताहराची गाडी बंद पडली. तो मदत मागण्यासाठी लखनजवळ येतो. लखनबरोबर संभाषण करतो. तो वार्ताहर लखनबरोबर बुद्धिबळ खेळण्याची इच्छा व्यक्त करतो. वार्ताहराला लखनचा खेळ खूप आवडतो. म्हणून तो लखनने पुढे स्पर्धा खेळाव्यात यासाठी प्रयत्न करतो. मोठ्या लोकांकडून त्यासाठी परवानगी मिळवून आणतो. लखनला पुढे खेळायचे आहे ;पण मुंबईला जायचे कसे हा प्रश्न त्याच्या समोर पडतो. त्यावेळी प्रीतम त्याला प्रोत्साहन देते. त्याला मुंबईला जाण्यास सांगते. प्रीतम व लखन कॉलेजचे काम आहे म्हणून खोटे सांगतात. लखन मुंबईला जाताना रेल्वेत वेगवेगळ्या स्वभावाची माणसे त्याला भेटतात. याचे चित्रण या कादंबरीत केले आहे.

लखन मुंबईला पोहचतो. वृत्तपत्र ऑफिसकडे जातो. त्या

ऑफिसमधले सगळे लोक त्याला मदत करतात. गांगुली, मणी हे भारताचे खेळाडू यांच्याशी लखनची लढत होते. गांगुली हरतो. नंतर मणी व लखन यांच्यात लढत होते. त्यावेळी लखन जिंकता येत असूनही हारतो. कारण त्याला त्यावेळी त्याच्या गावची आठवण येत होती.प्रीतमचे पत्र वाचून त्याच्या मनात काहूर उठते. प्रीतमचे सहकार्य मिळाल्यामुळे आपण येथपर्यंत आलो याची लखनला जाणीव आहे. प्रीतम व लखन एकमेकांशिवाय राहू शकत नाही; हे त्याला त्यावेळी कळते प्रेमाचे नाजूकपणे चित्रण या कादंबरीत व्यक्त केले आहे.

**गलोल- ललित लेख**

ललित लेख कोणत्याही विषयावर लिहिले जातात. म्हणजेच विषयाचे बंधन नसते. अनंत मनोहरांनी 'गलोल'मध्ये वेगवेगळे विषय घेऊन लेखन केले आहे. त्यामध्ये आर्थिक विषमता, राजकीय वातावरण, सामाजिक, सांस्कृतिक बदल या सर्व घटकांवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. उदा- १) चैतन्य १अ) एक कोकण.

कोकणातील लोक जे शहरात नोकरीसाठी जातात व सणावारासाठी गावाकडे येतात त्या चाकरमानी कोकणातील तरुणांची मनस्थिती रेखाटण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. त्या तरुणांच्या ठिकाणी एक प्रकारचे चैतन्य असते तर गावाकडची माणसे चाकरमानी येणार म्हणून आनंदीत असतात. त्यांच्यासाठी तयारी करतात. एक उत्सवाचे वातावरण असते. याचे उत्कट चित्रण येथे येते.

**२) चैतन्य-**

माणूस जास्त आत्मकेंद्रित, कोरडा व यांत्रिक बनत चालला आहे

याची खंत या लेखात प्रकट केली आहे. माणूस स्वार्थी बनतो. त्याला त्यावेळी वाटत नाही की, कोठेतरी मनाची कोवळीकता हवी आहे.

**३) गाव -वाढणारे- लोकांचे**

गाव व गावातील माणसे यांच्यात पडलेला फरक या लेखात आलेला आहे.

**४) गाव- गावाकडचे बसणारे**

गावातील लोक एकमेकांची आपुलकीने चौकशी करतात. कोकणातील जीवन खडतर असते. कोकणी लोकांचे होणारे हाल, निसर्गाला तोंड देण्याची तयारी यातून देवावर विश्वास ठेवणाऱ्या कोकणी माणसांचे चित्रण या लेखात आले आहे. कोकणी माणसाला प्रश्न पडतो. आपल्या हातात सर्व काही बदलण्याचे सामर्थ्य आहे का ?

**५) गोष्टी घराकडील-**

या लेखात राजाकाकांची मनस्थिती रेखाटली आहे. आपल्या माणसांत गेल्यावर त्यांची तब्येत चांगली होते. राजाकाकांना घरी आल्यावर आनंद होतो. याचे वर्णन या लेखात केले आहे.

**६) काळी पाचवी-**

हा लेख सैनिकांच्या जीवनावर लिहिला आहे. 'काळी पाचवी' ही एक कमांडर तुकडी आहे. ह्या कमांडर तुकडीला अकरा दिवस अन्नपाणी मिळत नाही. अशा अवस्थेत स्वत:ला युद्धात झोकून देणाऱ्या शूरवीर जवानांची ही 'काळी पाचवी' तुकडी आहे. ह्या जवानांना आपण जगू वाचू याची परवा नसते. ते सर्व हसतमुखाने युद्धाला सामोरे जातात. अशा जवानांच्या मृत्यूनंतर त्यांच्या कुटुंबाकडे जाणूनबुजून दुर्लक्ष

केले जाते आणि ह्याच जवानांच्या जीवावर आपले लोकनियुक्त प्रतिनिधी पुढच्या दोन पिढीला पुरेल इतकी संपत्ती मिळवून ठेवतात. हे वास्तव वाचकांच्या समोर या लेखाद्वारे येते.

### ७) वेगळे गणित-

मुंबईमध्ये वेगवेगळ्या प्रांतातून लोक येतात. आपला विकास साधतात. पैसा मिळवितात. पण कोकणातून येणारे लोक फुटपाथवर राहतात. मिळविलेला पैसा गावाकडे पाठवितात. स्वत: उपाशी राहतात. इतर घरातील मंडळींचा विचार करतात. कोकणातील चाकरमान्यांना बायको, मुले स्वत: एवढे जीवन त्यांना शिकविलेले नसते. हे जीवनाचे वेडे गणित सुटायला नको असे त्यांना वाटते.

### ८) पाच आवडी- निवडी

#### १) माझा पौष्टिक मित्र

या लेखामध्ये लेखकाला स्वत:ला वाटणारी भीती व्यक्त झाली आहे. लेखक असल्यामुळे आपल्या लेखनावर दुसऱ्याने प्रतिक्रिया द्याव्या असे वाटते, पण तसे होत नाही. लेखकाला पत्र येत नाहीत. त्यामुळे त्यांच्या मनात अस्वस्थता निर्माण होते. त्यांचेच मन त्यांना खायला उठते. माझे लेखन चांगले नसेल किंवा आलेली पत्रे लहान मुले फाडून टाकत असतील असे विचार मनात येतात.

## कथा-

### १) प्रेम कथांवर चित्रण-

अनंत मनोहर यांच्या कथांत कोठे ना कोठे प्रेमाचा उल्लेख हा येतोच. प्रेम हा मानवी जीवनाचा अविभाज्य घटक आहे. त्यामुळे होणारी

भावनिक गुंतागुंत त्यांच्या कथेत साकारताना दिसते. 'भेट' (कर्कोटक) या कथेत रवी व लीला यांच्या प्रेमसंबंधांचे चित्रण आले आहे. रवी व लीला यांनी २५ वर्षांनंतर आपण येथेच भेटू असे वचन घेतले होते. २५ वर्षांनंतर दोघांच्यामध्ये बराच फरक पडलेला होता. रवीला आपण लीलाला ओळखतोय की नाही याची चिंता वाटते.लीला आल्यावर रवी तिला चटकन ओळखतो. दोघे एकमेकांची चौकशी करतात. कुटुंबातील व्यक्ती कशा आहेत. रवी लीलाचं कौटुंबिक जीवनाबद्दल विचारतो; तर ती आपण सुखात असल्याचे खोटे सांगते. रवीला वाईट वाटेल म्हणून ती तिच्या दु:खाचा पाढा रवीपुढे वाचत नाही. लीला आनंदीत आहे, असे रवीला वाटते. तरीही तो 'दि हॉक डिटेक्टिव्ह एजन्सी'चा रिपोर्ट मागवतो. त्यात लीलाची खरी माहिती वाचतो. तो सुन्न होतो. रवी बाहेरच्या देशात राहतो. तीन लग्ने असफल झाल्यावर त्याच्या पहिल्या प्रेमाकडेसुद्धा सात्त्विक नजरेने बघतो. असा रवी या कथेत भेटतो. असा आधुनिक विचारसरणी असलेला रवी या कथेत भेटतो.

'मनोमनीची अबोल वेडी' (कर्कोटक) या कथेतील दमयंती ही विजयवर लहानपणापासून प्रेम करते. विजयच्या आवडी- निवडी जपते. वडील वारल्यावर कुटुंबाची जबाबदारी ही दमयंती स्वीकारते. स्वत: नोकरीवरून कुटुंबाचा चरितार्थ चालवणारी दमयंती या कथेत भेटते. दमयंती विजयला त्याच्यावर प्रेम आहे असे सांगत नाही. पण तिने दिलेले स्केच पाहून विजयच्या लक्षात येते. अशाप्रकारे मानवी जीवनातील प्रेमभावनेचे गुंतागुंतीचे धागे येथे चित्रित झालेले दिसतात.

### २) कामगार समस्यापर चित्रण करणाऱ्या कथा-

'दि रॅट रेस' (कर्कोटक) या कथेत कामगार प्रश्नावर विशेष लक्ष दिले आहे. कामगार संघटनेतील वेगवेगळ्या वृत्ती- प्रवृत्तींचे लोक, वरिष्ठ अधिकारी एकमेकांना शह देण्यासाठी कसा प्रयत्न करतात, त्यामुळे इतर कामगारांना कसा त्याचा त्रास होतो याचे चित्रण या कथेत आले आहे. संप झाला तर कामगार कसा भरडला जातो ही वास्तव जाणीव या कथेत व्यक्त होताना दिसते. 'झुंज' (बिल्वपत्र) या कथेत कामगारांचे नेतृत्व करणारा तुकाराम परब हा कामगारांना भडकवून आपली पोळी भाजून घेणारा स्वार्थी कामगार पुढारी या कथेत भेटतो. ह्या तुकाराम परबला शह देण्यासाठी दुसऱ्या पार्टीचे लोक त्याला लोकलमधून धक्का देतात. अशा प्रकारचे संघर्षमय चित्रण अनंत मनोहरांच्या कथांतून येते.

### ३) राजकारणी जीवनाचे चित्रण करणाऱ्या कथा-

'वंशज' (देवकाठी) या कथेतील नायक हा उपसंपादक आहे. 'जनसेवक' या वृत्तपत्रात काम करत असताना प्रतापरावांना आलेला अनुभव, लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती या कथेत पाहयला मिळतात. आपण कितीही लोकमान्यांच्यासारखे परखड वागायचे ठरविले तरी हे राजकारणी लोक सामान्य जनतेला फसवितात याचे चित्रण या कथेत आले आहे.

'एका प्रशिक्षणाची कहाणी' (कर्कोटक) या कथेतील रशीद हा तरुण, हुशार व स्वाभिमानी आहे. रशीद सरकारी कामात लाच घेत नाही. त्याला लाच घेण्यासाठी प्रवृत्त केले जाते. 'हे एक प्रकारचं तुमचं प्रशिक्षण म्हणा ना 'असे रशीदला उत्तर दिले जाते. भ्रष्ट राजकारण्यांमुळे

रशीदला होणारा त्रास याचे चित्रण या कथेत आले आहे. शेवटी रशीद नोकरी सोडतो. 'एका आवाहनाची फलश्रुती' (कर्कोटक) या कथेतील डॉक्टर पंकज गांगल हे भारतीय नेत्यांच्या भाषणाला भुलून नोकरी सोडून भारतात यायला तयार होतात. पण भारतीय लोकांकडून डॉक्टरांना अपेक्षित उत्तर मिळत नाही. यावरून डॉक्टर पंकज यांच्या लक्षात येते की, राजकारणी लोक बोलभांडी असतात. आश्वासने देतात पण ती पाळतात कुठे ? या कथेतून राजकीय नेत्यांची निष्क्रियता दिसून येते. 'मुकूट' (कर्कोटक) या कथेतील बाबासाहेब सी. एम. होण्याचे स्वप्न बघतात ;पण शेवटी सी. एम. होत नाहीत. त्यांची सी. एम. होण्याची धडपड या कथेत चित्रित केली आहे.

**४) कैदी जीवनावरील कथा-**

'आय शॅल प्रे फॉर यू' (बिल्वपत्र) या कथेत टोनी नावाचा कैदी आहे. टोनीला त्याने केलेल्या कृत्याबद्दल काहीच वाटत नाही. टोनीने अनेकांना फसविले. या गोष्टीची त्याला लाज वाटत नाही, तर समाधान वाटते. जेव्हा टोनीला फाशीची शिक्षा दिली जाणार हे निश्चित झाल्यावर त्याचे मानसिक संतुलन बिघडते. त्याला भेटायला फादर येतात. टोनी इतका वाईट असूनही फादर त्याच्यासाठी देवाकडे प्रार्थना करतात.

'आदिम' (कर्कोटक) या कथेतील पेनी हा वाईट वळणाचा तरुण आहे. पेनीला मिळालेल्या वाईट लोकांच्या संगतीमुळे पेनी बिघडतो. त्याच्या वाईट कर्मामुळे तो तुरुंगात जातो. पेनीची तुरुंगातून सुटका झाल्यावर पोलिस त्याला समजवतात, परत येथे येऊ नकोस असे सांगतात. तो फक्त शांत ऐकून घेतो. तुरुंगाच्या बाहेर आल्यावर त्याच्या चेहऱ्यावर हिंस्त्रपणाची छटा दिसते. त्याला त्याच्या दुश्मनाची दखल घेऊन त्याला शिक्षा द्यायची आहे. त्यासाठी दोन वर्षे तो वाट पाहत होता. पेनीला जुळी

बहीण होती. तिचे नाव मार्था. ही मार्था शांत व सोशीक होती. याउलट पेनीचा स्वभाव होता. मार्था पेनीला वाईट कृत्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न करत होती; पण पेनी तिचे ऐकत नाही. पेनीचा धंद्यातील साथीदार जॉन याने मार्थाला त्रास दिला. मार्थाला पेनीने चोरीचा माल कोठेही ठेवला आहे या गोष्टीवरून त्रास देतो. पेनी तुरुंगातून सुटल्यावर दुश्मनाचा (जॉन) चा शोध घेतो. जॉनला एका खोलीत बांधून ठेवतो. त्याच्या जखमेवर दारू ओततो. जेणे करून त्या जखमेला मुंग्या लागतील. जॉन स्वत:चे मरण स्वत: डोळ्याने बघेल अशी पेनीची इच्छा होती आणि हा न्याय आदिम असेल असे पेनीला वाटते.

## ५) चाळीतील संस्कृतीचे चित्रण करणाऱ्या कथा-

मध्यमवर्गीय लोकांचे चित्रण अनंत मनोहर करतात. 'पडदा','दास' (देवकाठी) या कथेत येणारी वर्णने मध्यमवर्गीय लोकांची आहेत. 'पडदा', 'दास' या कथांतून चाळीतील जीवनाचे दर्शन घडते. अपुऱ्या जागेत राहणे, प्रत्येक गोष्टी तडजोड, काटकसर करून संसार थाटणे हे किती अवघड असते याचे चित्रण या कथांमधून केले आहे. कितीही मनात असले तरी मनाप्रमाणे जगता येत नाही. त्यातून होणारा कोंडमारा या कथेतून प्रकट केला आहे. 'पडदा' या कथेतील 'अंमला' तिची होणारी घुसमट या कथेत पाहयला मिळते.

## ६) स्त्रीदु:खाचे चित्रण करणाऱ्या कथा-

स्त्रियांची वेगवेगळी असणारी दु:खे मांडण्याचा प्रयत्न अनंत मनोहरांनी केला आहे. त्यांच्या कथेत ते उच्चशिक्षित स्त्रियांपासून ते अगदी सामान्य स्त्रियांची दु:खे मांडतात. 'वाळवण' (देवकाठी) या कथेतील रमाबाई सामान्य घरातील आहे. नवऱ्यासाठी स्वत:च्या जीवनाचे

वाळवण करून घेते. 'ही वाट एकटीची' (देवकाठी) या कथेतील सोनाही शिकलेली, नोकरी करणारी सुस्वभावी अशी मुलगी आहे; पण तिच्या मनासारखे एकही स्थळ तिला मिळत नाही. तिचे लग्न ठरत नाही म्हणून जातीतील लोक बोलतात. सोनाला जातीबाहेर जाऊन लग्न करता येत नाही आणि जातीत तिच्याइतका शिकलेला मुलगा सापडत नाही. त्यावेळी तिला होणारा त्रास या कथेत प्रकट करण्याचा प्रयत्न केला आहे. सोनाला तिच्या जातीतला फौजदार मुलगा सांगून येतो ; पण त्याचे पहिले लग्न झाले होते. सोनाला निनावी पत्र येते. त्यात फौजदाराने त्याच्या पत्नीला मारले असे वाचून ती स्तब्ध होते. अशा पुरुषाबरोबर संसार करण्यापेक्षा जीव दिलेला बरा असा सोना विचार करते. शेवटी सोना रेल्वेखाली जीव देते. 'चेहरा ' (बिल्वपत्र) या कथेतील ग्लोरिया सौंदर्यसम्राज्ञी होती. ग्लोरियाला सौंदर्य आहे तोपर्यंतच प्रसिद्धी, मान मिळतो पण तिचे सौंदर्य गेल्यावर तिला कोणीही विचारत नाही. ग्लोरियाला जीवनात आलेल्या कडू अनुभवाचे चित्रण या कथेत केले आहे.

'लाट' (कर्कोटक) या कथेतील जानकी ही एक कर्तबगार स्त्री आहे. तिच्या ऑफिसमध्ये काम करणारा कलिग भार्गव याच्याविषयी तिच्या मनात आकर्षण निर्माण होते. पण ती व्यक्त करू शकत नाही. तिच्या मनाचा भावनिक कोंडमारा होतो. याचे चित्रण अनंत मनोहर समर्थपणे करतात.

### ७) आधुनिक संस्कृतीचे दर्शन घडविणाऱ्या कथा-

'मृगया' (कर्कोटक) या कथेतून दोन पिढीतील अंतर कसे पडत जाते याचे चित्रण केले आहे. 'रक्त' (कर्कोटक) या कथेतून दोन भिन्न

संस्कृती असणारे स्त्री- पुरुष एकत्र राहत असताना उभयतांचा होणारा भावनिक, मानसिक, कोंडमारा चित्रित केला आहे. 'डेड एन्ड' (कर्कोटक) या कथेत विभक्त कुटुंब पद्धतीचे वर्णन केले आहे. या कथेतील जॅक हा क्रिकेटर आहे. त्याची पत्नी मिली त्याला प्रोत्साहन देते. जॅकला यश मिळत जाते. तसा तो गैरमर्जीने वागतो हे मिलीला आवडत नाही. मिली घरात नसताना दुसऱ्या स्त्रीबरोबर जॅक राहतो. हे पाहून मिली जॅकला सोडून जाते. जॅक पुन्हा आत्मविश्वास हरवल्यासारखा वागतो. त्याचे खेळावर लक्ष लागत नाही. त्याला संघातून बाहेर काढण्याचा विचार केला जातो. त्याचवेळी लॉरिसा जॅकच्या जीवनात येते. जॅकला प्रोत्साहन देते. तो मॅच जिंकतो. यावरून पाश्चात्त संस्कृतीचे दर्शन या कथेतून लेखकांनी घडविले आहे. सांस्कृतिक पडलेला फरकही जाणवतो.

## ८) सामाजिक समस्या मांडणाऱ्या कथा-

अनंत मनोहरांच्या कथेचे विशेष म्हणजे त्यांनी वेगवेगळ्या स्तरावरील लोकांची दु:खे, समस्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. उदा. पोटासाठी भटकंती (बिल्वपत्र) या कथेतील प्राध्यापक ठोके यांना शिक्षण घेण्यासाठी कितीतरी कष्ट करावे लागतात. कॉलेजवर नोकरी मिळते पण त्यांना शिक्षण क्षेत्रात राजकारणी लोकांचा हस्तक्षेप अधिक जाणवतो. त्यामुळे ते निराश होतात. मुलेही कॉलेजमध्ये बसत नाहीत. कारखानदारी लोकांची मक्तेदारी या कॉलेजमध्ये दिसते. शिक्षणातील भ्रष्टाचार या कथेत मांडला आहे.

'झोका' (कर्कोटक) या कथेतून शिक्षणातील फोलपणा दाखविला आहे. शिक्षण क्षेत्रात हुशार असणे महत्त्वाचे नाही तर, वशिला जितका

जबर तितके तुमचे काम लगेच होणार. डॉ. जयंत पाध्ये व्हायवा घेण्यासाठी मेडिकल कॉलेजमध्ये जातात तर त्यांच्या मित्राचा मुलगा हेमचंद्र याला काही येत नसतानाही त्याला पास करावे लागते. शिक्षणातील वशिलेबाजीचे चित्रण या कथेत दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.

'रात्रंदिवस आम्हा' (कर्कोटक) या कथेतून मंगलभाई छोटाणी या दुकानदाराची सेल्सटॅक्स चुकविण्याची धडपड चित्रित केली आहे आणि अशा माणसाला साथ देणारे पांढरपेशी लोक कशी मदत करतात या कथेवरून भ्रष्टाचार कसा घडतो याचे चित्रण केले आहे.

'जर्म' या कथेतील सत्यव्रत हा वास्तवात जगणारा आहे. सत्यव्रत जे जे प्रस्थापित आह त्यांच्या विरुद्ध पेटून उठणारा तरुण या कथेत पाहयला मिळतो. सत्यव्रताने जातीयता हा मोठा प्रश्न आहे याची जाणीव या कथेत करून दिली आहे.

**समारोप-**

अनंत मनोहरांच्या साहित्यातून वेगवेगळे विषय आले आहेत. त्यामुळे त्यांचे लेखन एकसुरे वाटत नाही. त्यांच्या कादंबरीतून कोकणी माणसांचे समस्यामयी जीवन रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. 'राब' या कादंबरीतून समाजचित्रण रेखाटले आहे. राबाप्रमाणेच कोकणी माणसांचे जीवन खडतर आहे. त्यांनी या कादंबरीत अनेक पात्रांची निर्मिती केली आहे. त्या त्या पात्रांचे स्वभाव दर्शन, वृत्ती- प्रवृत्ती, ती माणसे त्या परिस्थितीत कशी वागली हे दाखविल्यामुळे ती माणसे आपल्या समाजातील आहेत हे जाणवते. अनंत मनोहरांचे समाजातील सूक्ष्म निरीक्षण येथे प्रकट होताना दिसते. कोकण आणि कोकणी जीवन मग त्यांच्या रीतिरिवाज करण्याच्या पद्धती, चालीरिती, अंधश्रद्धा,

एकमेकांची काळजी घेणारे लोक या कादंबरीत चित्रित केले आहे. कोकणात पारंपरिक पद्धतीने शेती केली जाते. त्यासाठी शेतात 'राब' घातला जातो. हा राब शेतात घालताना शेतात जळण टाकून ते पेटवून देऊन त्याची होणारी राख ही शेतासाठी पोषक असते. त्यामुळे हे पारंपरिक तंत्र कोकणी लोक वापरतात. ग्रामीण संस्कृती या कादंबरीतून व्यक्त होताना दिसते. कोकण म्हटले की, निसर्गाचा उल्लेख हा येतोच. निसर्गातील ऋतुचक्रांमध्ये होणारे बदल, त्या बदलांचा कोकणी जीवनावर होणारा परिणाम, येणाऱ्या अडचणी आणि त्या अडचणींतून वाट काढणारे लोक या कादंबरीत भेटतात. या कादंबरीत जीवन चित्रण, समाज चित्रण रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. या कादंबरीतील नायक शिवा याला त्याचा चुलता आजोबा (धोंडूबा मोरे) सूडभावना ठेवून जमीन वाटून देतो. शिवाला जमीन देताना हलक्या प्रतीची जमीन देतो. या सर्व प्रकरणात धोंडूबा मोरेला बाळू मोऱ्याचा पाठिंबा होता. बाळू मोऱ्याला कोणाचे चांगले झालेले बघवत नाही. त्यामुळे शिवाच्या घरात ढवळाढवळ करत होता. अशा कुचक्या वृत्तीच्या बाळू मोऱ्याचे च चित्रण या कादंबरीत केले आहे.

अनेक घटना, पात्रांची साखळी, गुंफण होऊनही दीर्घ कादंबरी तयार झाली आहे. यात स्त्री चित्रणेही समर्थपणे आली आहेत. गुणा वहिनी, अन्नपूर्णा वहिनी, पुतळी, बायो इत्यादी स्त्रियांची व्यक्तिचित्रणे आली आहेत. बायो ही एक सामान्य स्त्री आहे. बायोला मूल-बाळ होत नाही म्हणून तिला कशाचाच मान दिला जात नाही. वांझोटी हा शिक्का तिच्यावर मारला जातो. बायोची मानसिकता या कादंबरीत

उत्कटपणे रेखाटली आहे. कोकणातील तरुण मंडळी शहरात नोकरीसाठी जातात. यावरून आर्थिकतेवर प्रकाश पडतो. उन्हाळा, हिवाळा काहीही काम करून पोट भरता येते ; पण पावसाळ्यात कामच मिळत नाही. त्यामुळे घरात खायला अन्न मिळत नाही. काही वेळेला भाजी उकडून खाऊन भूक भागविली जाते. हे वास्तवचित्रण या कादंबरीत केले आहे.

'दोन मुठी तांदूळ' या लघुकादंबरीतून जीवनवास्तव दाखविण्याचा प्रयत्न केला आहे. माणसाच्या पोटासाठी दोन मुठी तांदूळच लागते पण तेही मिळत नाही. यावरून भिरगावातील माणसांची होणारी कुचंबणा व्यक्त केली आहे. या भिरगावात केशव शिक्षक म्हणून येतो. शिक्षणासाठी भिरगावातून लोक त्याला मदत करतात. जातीय सलोखा त्या गावात आहे. कोकणाचे वर्णन या कादंबरीत केले आहे. कोकणातील माणसे उन्हाळा, हिवाळा काम करतात. पण इच्छा असूनही पावसाळ्यात काम मिळत नाही. पाऊस एकतर बाहेर पडू देत नाही आणि पोटाची भूक काही केल्या जात नाही हे वास्तव चित्रण केशव करतो. शाळेत वेगवेगळ्या सुविधा करून मुलांना शाळेकडे आकर्षित केले जाऊ शकते पण मुलांच्या पोटात अन्नाचा कण नसल्यावर त्यांचे लक्ष अभ्यासावर कसे लागेल ? हा प्रश्न केशवला पडतो.

'अरण्यकांड' या कादंबरीत वन्यजीवन रेखाटले आहे. जंगलातील प्राण्यांचे सूक्ष्मनिरिक्षण करून प्रकटीकरण केले आहे. त्याचबरोबर मनुष्याच्या जंगलात राहणारे आदिवासी लोक पोटासाठी वाटेल ती जोखीम घ्यायला तयार असतात. जीवापेक्षा पोटाची भूक

मोठी आहे म्हणून जीवाची पर्वा न करता ते जंगलात मिळेल त्याची, जमेल तशी शिकार करतात, जंगलातील संपत्ती बाहेर आणून विकतात. फॉरेस्ट अधिकारी यांना आदिवासी लोकांकडून त्रास सहन करावा लागतो. आदिवासी लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती रीति-रिवाज, अंधश्रद्धा, परंपरा यांची ओळख या कादंबरीतून होते.

'दक्षिण वारा' या कादंबरीतून एका ख्रिश्चन स्त्रीवर ओढविलेल्या प्रसंगाचे चित्रण केले आहे. मेरी ही दयाळू वृत्तीची स्त्री आहे. मेरीच्या जीवनातील शोकांतिका पाहवयास मिळते. मेरीची ओळख नसताना देखील मेरी डॉनला संभाळते. वास्तविक ही डॉन गुन्हेगार वृत्तीची, बेताल वागणारी, वायफळ मुलगी आहे. हे मेरीच्या लक्षात येत नाही. डॉन मेरीला धोका देते. मेरीच्याच घरात राहून तिलाच नजरकैदेत ठेवते. मेरीचे हाल हाल करते. डॉनबरोबर डॉनचा प्रियकरही त्याच घरात लपून बसला होता. मेरीच्या घराचा ताबा डॉनने घेतला. मेरीला कोणालाही भेटू दिलं जात नाही. मेरीचा शेजारी अन्तोन मेरीला सतत समजावत होता की ही मुलगी चांगली नाही. तरीही मेरी त्याचे ऐकत नव्हती. मेरीला या गोष्टीचा पश्चात्ताप होतो. शेवटी अन्तोनच मेरीची सुटका करतो.

अनंत मनोहरांच्या कथांमध्ये वेगवेगळे विषय हाताळल्यामुळे त्यांच्या साहित्याचा कंटाळा येत नाही. त्यांच्या 'देवकाठी', 'बिल्वपत्र' आणि 'कर्कोटक' या कथासंग्रहांतून खालच्या स्तरापासून ते उच्च समजल्या पांढरपेशा लोकांच्या समस्या मांडल्या आहेत. सांस्कृतिक बदलामुळे होणारा भारतीय स्त्रीचा कोंडमारा त्यांनी टिपला आहे. त्यांच्या कथेत प्राणी जीवनावर विशेष प्रकाश टाकला आहे. आधुनिक जीवन

शैली आणि त्यामुळे होणारा त्रास व्यक्त केला आहे. 'प्रेम' या नाजूक विषयावरही त्यांनी कथा लिहिल्या आहेत. कामगार प्रश्न मांडण्यासाठी त्यांनी कथेचा साचा वापरला आहे. कमीत कमी शब्दांत त्यांना भरपूर काहीतरी वाचकांना सांगायचं असते. त्यासाठी ते प्रयत्न करतात. 'कैदी जीवन, राजकारणी लोकांच्या वृत्ती- प्रवृत्ती, चाळ संस्कृती या विविध विषयांमुळे त्यांचे साहित्य बहरून गेले आहे. विषयांची विविधता आणि कौशल्यपूर्ण मांडणी यामुळे या सर्वच कथा वाचनीय झाल्या आहेत. त्यांच्या कथावाङ्मयात तोचतोचपणा जाणवत नाही. मानवी जीवनाचा विशालपट त्यांच्या साहित्यातून उलगडत जाताना दिसतो. अनंत मनोहर यांच्या साहित्याचे सर्वस्पर्शित्व हे खास वैशिष्ट्य आहे. म्हणून त्यांचे कथावाङ्मय अभ्यासनीय आणि चिंतनीय झाले आहे.